




दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक २३५ ●सोमवार, दि. ०२ डिसेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये


## थोडक्यात

१. श्रीकांत शिंदे उपमुख्यमंत्री होणार ही चर्चा केवळ माध्यमांमध्ये आहे, अमित शाह यांच्यासोबत एक बैठक झाली; आमची आणखी एक संयुक्त बैठक होणार; साताऱ्यातील पत्रकार परिषदेत काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची माहिती, काळजीवाहू मुख्यमंत्री साताऱ्यातून मुंबईत परतले

२. एकनाथ शिंदेंची तब्येत नाजूक, त्यांना डॉक्टरांची गरज आहे की मांत्रिकाची? खासदार संजय राऊतांनी काळजीवाहू मुख्यमंत्र्यांना डिवचलं, इतकं बहुमत असतानाही सरकार स्थापनेचा दावा अजून का केला नाही? आम्ही असतो, तर राष्ट्रपती राजवट लागली असती; संजय राऊतांची टीका

३. अजितदादांनी बारामतीच्या विधानसभेची निवडणूक जिंकली, पण पिक्चर अभी बाकी है! आक्षेप घेत युगेंद्र पवारांचा निवडणूक आयोगाकडे मत पडताळणीसाठी अर्ज, अजितदादांविरोधात पराभवानंतर युगेंद्र पवार पुन्हा ॲक्शन मोडमध्ये! सुरू केला आभार दौरा

४. विधानसभेतील विजय म्हणजे निवडणूक आयोग अन् भाजपनं मिळून केलेल्या पापाचं फळ; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचा घणाघात

५.अजितदादा आमच्यामध्ये आले नसते तर १०० जागा आल्या असत्या, शिवसेना शिंदे गटाचे आमदार गुलाबराव पाटील यांचं मोठं वक्तव्य, गुलाबरावांनी गुलाबराव सारखं राहावं त्यांनी जुलाबराव होऊ नये, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांचे प्रत्युत्तर

६. माळशिरसमध्ये वेगळाच पॅटर्न, मारकडवाडीतील ग्रामस्थ पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यावर ठाम, गावातील विरोधकांचा मतदानावर बहिष्कार ,आमदार रोहित पवारांच्या नेतृत्वात ईव्हीएमची प्रतिकृती जाळली

७. प्रत्येक जोडप्याला किमान तीन मुलं हवीत, लोकसंख्या शास्त्राचा हवाला देत आरएसएसचे सरसंघचालक मोहन भागवतांचे वक्तव्य, मोहन भागवत म्हणतात पोरं पैदा करा, ते काही स्कीम आणणार आहेत का? एम आयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांचा खोचक सवाल

८. बस चालकाकडून पूर्वी ७ वेळा अपघात; गोंदिया शिवशाही बस अपघात प्रकरणी मोठी माहिती, चालकावर निलंबनाची कारवाई

९. आंध्र प्रदेशमधील नायडू सरकारचा मोठा निर्णय, राज्यातील वक्फ बोर्ड बरखास्त

१०. WTC फायनल शर्यतीतून न्यूझीलंड बाहेर; आता भारत, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका या संघांमध्ये असणार चुरस






# पुढील उपोषण आझाद मैदानात

## तीर्थक्षेत्र तुळजापुरातून मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांची घोषणा



**धाराशिव । प्रतिनिधी**

सरकार कोणाचेही आले तरी आरक्षण घेणारच. त्यासाठी पुढील कार्यक्रमाचे नियोजन सुरु आहे. आता सामूहिक आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरवली सराटीसह प्रत्येक घरात हे उपोषण केले जाईल. समाजाचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. कदाचित यावेळी मुंबई येथे आझाद मैदानावर असू शकेल, अशी जाहीर घोषणा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केली. विधानसभा निवडणुकीत फॉर्म्युला जुळला नाही अन्यथा सुपडा साफ केला असता, अशा शब्दांत त्यांनी राजकीय टिप्पणीही केली.

जरांगे पाटील हे आंतरवली सराटी येथून रविवारी तुळजापूर आणि पंढरपूर येथे दर्शनासाठी निघाले होते. धाराशिव जिल्ह्यात त्यांचा ताफा दाखल होताच ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आरक्षणाची यापुढील लढाई सामूहिक आमरण उपोषणाने केली जाईल. कदाचित हे उपोषण मुंबई येथे आझाद मैदानावरही होऊ शकते. आता आरक्षणाची ही चळवळ थांबवणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रात मराठा समाजाशिवाय कोणाचीही सत्ता स्थापन होऊ शकत नाही. यावेळी मराठा समाजाने मोठ्या संख्येने ओबीसी आमदारही निवडून आणले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान फॉर्म्युला जुळून आला नाही. अन्यथा सुपडा साफ केला असता. मराठा आरक्षणासाठी इथून पुढे सामूहिक आमरण उपोषणाचे हत्यार उपसणार असल्याचे जाहीर करुन सरकार कोणाचेही असो, मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार. त्यासाठी मुंबई येथे आझाद मैदानावरही आंदोलन करण्याची वेळ आल्यास मागे हटणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी यावेळी दिला.

दरम्यान, जरांगे पाटील यांचा ताफा जिल्ह्यात दाखल होताच महामार्गावरील विविध गावांत त्यांचे फुलांची उधळण करुन स्वागत करण्यात आले. तीर्थक्षेत्र तुळजापुरात मोठ्या जल्लोषात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तुळजाभवानी मंदिरापर्यंत मराठा समाजबांधवांनी एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत उत्स्फुर्त रॅली काढली. त्यानंतर जरांगे पाटील यांनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांचा ताफा पंढरपूरकडे रवाना झाला.

## डॉ. ज्योतीताई मेटे यांना विधान परिषदेवर संधी द्या : अभिजीत पवार



**बीड । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील यांच्यानंतर मराठा आरक्षणाची चळवळ जिवंत ठेवणारे लोकनेते स्व विनायक मेटे साहेब यांच्या पत्नी डॉ ज्योतीताई मेटे यांनी विधानसभा अपक्ष म्हणून निवडणुक लढवली आहे. उच्चशिक्षित म्हणून ज्योतीताई मेटे यांच्याकडे पाहिले जाते. बीड जिल्ह्यामध्ये विकासाचा व्हिजन घेऊन डॉ. ज्योतीताई मेटे निवडणूकच्या रिंगणामध्ये उतरल्या होत्या. मेटे साहेब यांनी सुरू केलेली व्यसनमुक्ती अभियान ज्योतीताई यांनी पुढे चालू ठेवले आहे. बीड जिल्हा हा व्यसनमुक्त करण्याचा निर्धार ज्योती मेटे यांनी केलेला आहे. बीड जिल्ह्यामध्ये तरुणांच्या हाताला रोजगार मिळावा यासाठी अनेक वेळा साहेबांनी सुद्धा प्रयत्न केलेले आहेत यानंतर ज्योतीताईंनी सुद्धा अनेक वेळा प्रयत्न केलेले आहेत. ज्योतीताई मेटे यांना विधान परिषदेवर घेतल्यावर नक्कीच बीडचा विकास होईल. डॉ. ज्योतीताई मेटे यांना विधान

▶▶ उर्वरित पान २ वर

## आमदारांच्या वरदहस्तामुळे पवनचक्की कंपन्यांकडून बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची पिळवणूक

**बीड । प्रतिनिधी**

आमदारांच्या वरदहस्तामुळे पवनचक्की कंपन्यांकडून बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू आहे. आर्थिक हितसंबंधातून पवनचक्की कंपन्यांना आमदारांचे पाठबळ मिळत आहे. परंतु बालाघाटवरील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन तक्रारी कराव्यात, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा



अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान, अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

बीड तालुक्यातील बालाघाटावरील १०-१२ गावांच्या परिसरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे. हे काम करणाऱ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांसोबत अरेरावीची भाषा करतात. कंपन्यांनी शेतीमध्ये टॉवर उभारले असून या टॉवरवरील तारा ओढताना पिकांचे नुकसान झाले. त्याची शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची भरपाई दिली मिळत नाही. तसेच, टॉवर व विद्युत तारांमुळे बाधित होणाऱ्या शेतीची नुकसान भरपाई कंपनीने निश्चित केलेली नाही. त्यामुळे ही भरपाई देण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. तसेच, कंपनीकडून यापूर्वी शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्या पोटी चेक दिलेले आहेत, त्यापैकी अनेक चेक बाऊन्स झालेले असून ही

▶▶ उर्वरित पान २ वर

## मतदान यंत्रांच्या तपासणीस सरकार का घाबरते ?

### ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या आत्मक्लेश आंदोलनानंतर चव्हाण यांनी आढाव यांची, त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली.

**पुणे । प्रतिनिधी**

'निवडणूक आयोगाला स्वायत्तता आहे, मुक्त वातावरणात पारदर्शकपणे निवडणुका घेतल्या आहेत, असा आयोग आणि सरकारकडून निर्वाळा दिला जात असला, तरी जनतेच्या मनात मतदान यंत्रांबाबत शंका आहे. मग, सर्व मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या मोजणीला किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील इलेक्ट्रॉनिक तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याला सरकार



का घाबरते,' असा प्रश्न माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी रविवारी उपस्थित केला. 'सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ठरावीक मतदान यंत्रांतील मतचिठ्ठ्यांची तपासणी झाली, तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही. कारण, ठरावीक मतदान यंत्रांमधील विदा (डेटा) नष्ट केला जाऊ शकतो,' असेही ते म्हणाले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या आत्मक्लेश आंदोलनानंतर चव्हाण यांनी आढाव यांची, त्यांच्या घरी जाऊन

▶▶ उर्वरित पान २ वर

## दीड कोटी बालकांना आरोग्य विभाग देणार जंतनाशक गोळी ! राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमीत्त...

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात येत्या ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात येणार असून या दिवशी १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना आरोग्य विभागाच्या वतीने जंतनाशक गोळी दिली जाणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने याबाबत नियोजन केले असून शिक्षण विभाग व बाल कल्याण विभाग यांच्या समन्वयाने सुमारे १ कोटी ४८ लाख मुला-मुलींना जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. जंतामुळे बालकांमध्ये व किशोरवयीन मुला- मुलींमध्ये




निमिया, पोटदुखी, उलट्या, अतिसार, मळमळ, भूक मंदावणे आदी आजारांचा धोका उद्भवतो. त्यामुळे हा संभाव्य धोका टाळण्यासाठी १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींनी जंतनाशक गोळी घ्यावी, असे आवाहन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# आ.संदीप क्षीरसागरांचा बीडकरांकडून अभूतपूर्व नागरी सत्कार

## बीडकरांनी मला कधीच एकटे पडू दिले नाही, सगळे बीड माझे कुटुंब: आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मायबाप जनतेने मला कधीही एकटे पडू दिले नाही. सगळे बीडच माझे कुटुंब आहे. जनसमान्यांच्या आशिर्वादानेच मी दुसर्यांदा आमदार झालो असून त्यांच्यासाठी पूर्णवेळ उपलब्ध असेन असे आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या नागरी सत्कार सोहळ्यात व्यक्त होताना सांगितले. रविवारी (दि.१) रोजी नागरी सत्कार समितीच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांचा, दुसर्यांदा आमदार पदी निवडून आल्याबद्दल सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते.



रविवार (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे नागरी सत्कार समिती, बीड यांच्या आयोजनाने सलग दुसर्यांदा विधानसभा सदस्यपदी निवडून आल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी समस्त बीडकरांच्या वतीने आ.क्षीरसागर यांचा अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. निवडणुकीत आपल्याकडे शेकडो प्रवेश झाले. परंतु हे प्रवेश कसल्याही अटी आणि शर्ती विना झाले. विरोधकांनी निवडणूक काळात अक्षरशः पैशांचा बाजार मांडला होता. परंतु बीडच्या जनतेने भूमिकेशी तडजोड न करता एकनिष्ठ राहिल्याने माझी साथ दिली. आता मला माझ्या बीडकरांनी निवडून दिले आहे. मी दुसर्यांदा आमदार झालो आहे. परंतु काही लोकांचा प्रश्न आहे, आता आपण सत्तेत नाही मग परत आपल्याला निधी मिळणार नाही! पण आता या गोष्टीची काळजी करायची गरज नाही. मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा सरकारने अडवून धरलेल्या आहेत. आता या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका होऊन प्रशासक राज जेव्हा हटेल तेव्हा लोक निहाय निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना देणे अनिवार्य असते. सत्ताधाऱ्यांचा त्यातील एक रूपयाही कमी करता येत नाही.

▶▶ उर्वरित पान २ वर



### संदीपभैय्यांना व्हिजन नसते तर बीडकरांनी त्यांना दुसर्यांदा निवडून दिले असते का ? – खा.बजरंग सोनवणे

संदीपभैय्यांचे विरोधक पत्रकार परिषद घेऊन विचारत आहेत की, संदीपभैय्यांनी त्यांचे व्हीजन काय ते सांगावे. आता हा प्रश्न विचारण्याचा अधिकार केवळ बीडच्या जनतेला आहे. परंतु तरीही मी एक प्रश्न त्या विरोधकांना विचारू इच्छितो, जर संदीपभैय्यांकडे व्हीजन नसते तर बीडकरांनी त्यांना सलग दुसऱ्यांदा निवडून आणुन आमदार केले असते का ? असा सवाल खा.बजरंग सोनवणेंनी या कार्यक्रमातून विरोधकांना केला. बीडकरांनी दुसर्यांदा वाघ विधानसभेत पाठवला आहे. हा खासदार बजरंग सोनवणे कायम तुमच्यासोबत त्यामुळे काळजी करण्याची गरज नाही. संदीपभैय्यांच्या रूपाने पवार साहेबांच्या राष्ट्रवादीचा झेंडा बीडमध्ये फडकला आहे. असे खा.बजरंग सोनवणे यांनी या कार्यक्रमात बोलताना म्हटले.

# असमानता संपवा ,एड्स संपवा आणि जगण्याला बळ द्या...!




बीड जिल्हा हा प्रामुख्याने कायम ऊस तोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख असलेला यामुळे साहजिकच मोठ्या प्रमाणात लोक ऊस तोडणी साठी इतर जिल्हात जातात पण पाहिजे ती आरोग्याची काळजी घेत नाहीत तसे पाहता आपण संगणकीय यूगात जगत आहोत, समाजान विज्ञानाच्या रूपाने खूप मोठी क्रांती केली आहे. तसेच समाजात वेगवेगळ्या प्रसार माध्यमांच्या माध्यम ातून जनजाग्रती रॅली, पोस्टर प्रदर्शन, कलापथक कार्यक्रम, आरोग्य शिबिरे, बचत गट मेळावे, जनजाग्रती मेळावे तसेच जाहिराती इत्यादि प्रसार माध्यमानी समाज HIV/AIDS माहिती संदर्भात पिंजून काढला असला तरीही HIV/AIDS शब्द उच्यारताच व्यक्तीच्या चेहेर्यावरील हाव-भावमध्ये मोठ्या प्रमाणात बदल दिसून येतो. कारण समाज जाग्रती झाली असली तरी देखील मन जाग्रती त्याप्रमाणात झाली नाही, म्हणून एचआयव्ही सह जीवन जगणार्या व्यक्ती बरोबर आजही समाजात मोठे गैरसमज आहेत. यामुळे त्यांना कलंक व भेदभावाची वागणूक मिळते आहे. HIV होण्याचे मुख्य चार कारणे जरी असले तरीदेखील समाजाने स्वतः तयार केलेले अनेक गैरसमज जनजागृती होऊन देखील दूर होत नाहीत,किंवा आपण ती दूर होऊच देत नाहीत आणि हेच खरे कारण आहे. HIV सह जगणारा माणूस त्या आजारपेक्षाही सम ाजाने दिलेल्या वागणुकीमुळे (कलंक व भेदभावने) लवकर खचतो त्याची जगण्याची उमेद कमी होते. यासाठी समाज जाग्रती बरोबर मन जाग्रती आपले पनाची भावना, प्रेमाची भावना, समाज परिवर्तनची भावना, कलंक व भेदभाव मिटवण्याची भावना ही खर्या अर्थाने HIV सह जीवन जगणार्या व्यक्तीच्या जीवनमान उचावण्यासाठी उचललेले पहिले पाउल आसेल. या लोकांना चांगले जीवन जगण्याची उमेद निर्माण केली तरच हा प्रकल्प खर्या आर्थणे यशस्वी झाला व हा जागतिक एड्स दिन साजरा करण्यामागचा हेतु सार्थ झाला असे आपणाला म्हणता येईल.

आज समजामध्ये तुम्ही HIV तपासणीचे महत्व जाणून आजच तपासणी करा असा संदेश जागतिक एड्स दिनाच्या माध्यमातून देण्यात येत आहे. जिल्हामध्ये महाराष्ट्र राज्य एड्स नियत्रन संस्था मुंबई यांच्या सहकार्याने ग्रामीण विकास मंडल बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड यासारख्या संस्थेच्या माध्यमातून HIV/AIDS जनजाग्रती तपासणी मार्गदर्शना बरोबर बेटी बचाव, झाडे लावा झाडे जगवा, ग्राम स्वछ्यता आरोग्य शिबीर यामध्यमातून जिल्हाभर वेगवेगळे कार्यक्रम घेतले जातात. तसेच जिल्हा एड्स प्रतिबंध व नियत्रन विभाग बीड व सर्व ICTC center च्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर HIV, STI, TB तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन ग्रामीण विकास मंडल बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड तर्फे केले जात आहे. वरील कार्यक्रमाच्या माध्यमातून आज समाजातील HIV च्या वाढत्या प्रमाणाला बर्यापैकी आळा बसला आहे कलंक व भेदभावाचे प्रमाणं कमी होताना दिसत आहे. तसेच क्खत सह जीवन जाणार्या व्यक्तिला चांगले जीवन जगण्यासाठी चांगली दिशा नवीन उमेद या जन जगर्ती शिबिराच्या माध्यमातून मिळताना दिसते. याचे सर्व क्षेय महाराष्ट्र राज्य एड्स नियत्रन संस्था मुंबई व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियत्रन विभाग बीड च्या अंतर्गत RT Center/ICTC Center बीड ग्रामीण विकास मंडल बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड यांना जाते.

अशाच प्रकारचे कार्य ग्रामीण विकास मंडल बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड या संस्थेच्या माध्यमातून जिल्हाभर चालू आहे, व ते यापुढे देखील समाज जनजगर्ती व समाज परिवर्तनाच्या द्रष्टीने अखंडपणे असेच चालूच राहील. यामुळे येणारी पिढी ही नक्कीच निरोगी व सुदृढ आसेल त्यामुळे देशाच्या विकासाला नक्कीच मोठा हातभार लागेल.

१) ENDING THE HIV EPIDEMIC.

२) शून्य गाठायचे आहे.

३) तुम्ही क्खत तपासणीचे महत्व जाणून घेतले आहे का ?

४) KNOW YOUR STATUS.

५) मोफत HIV तपासणी माहिती टोल फ्री नं- १०९७

या कार्यक्रमासाठी नेहमीत मार्गदर्शक म्हणून

मा. डों. साबळे साहेब ( जिल्हा शल्य चिकित्सक बीड)

मा.सौ. साधना गंगावणे (जिल्हा कार्यक्रमधिकारी)



मा. सुहास कुलकर्णी ( जिल्हा प्रवेशक बीड)

मा. सय्यद सय्यद बाबामिया (अद्यक्ष ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड) सहकार्य मिळाले आहे.

- मा. वाघमारे रामेश्वर हरिश्चंद्र, जिल्हा साधन व्यक्ती बीड
( ७५८८०४२३६३)
ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा अंतर्गत लिंक वर्कर स्कीम बीड

# रेल्वे तिकीटवरील चुकीची तारीख अशी करा दुरुस्त, जाणून घ्या

दुरच्या प्रवासासाठी बहुतांश प्रवाशी हे रेल्वे प्रवासाला प्राधान्य देतात. सुरक्षित प्रवास, वेळेत पोहचण्याची हमी आणि परवडणारे दर यामुळे अनेकांची पहिली पसंती ही रेल्वेलाच असते. त्यामुळे रेल्वेने बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. आरामदायी प्रवास व्हावा यासाठी अनेक जण काही महिन्यांआधीच तिकीट काढून ठेवतात. मात्र काही वेळा गडबडीत तिकीट बूक करताना प्रवासाची चुकीची तारीख टाकली जाते. त्यामुळे ऐनवेळेस गैरसोय होते. या एका चुकीमुळे अनेकांना मनस्ताप सहन करावा लागतो. मात्र प्रवासाची तारीख दुरुस्त करता येते. तिकीटावरील प्रवासाची चुकलेली तारीख कशी दुरुस्त करायची ? हे आपण जाणून घेऊया.

सर्वसामांन्यांना ऑनलाईन तिकीट कसं मिळवायचं ? हे माहित नसतं. अशावेळेस हे सर्वसामन्य प्रवाशी एजंटकडून किंवा तिकीट




खिडकीवरुन आरक्षित तिकीट मिळवतात. आरक्षित तिकीटासाठी प्रवाशाला कुठून कुठपर्यंत प्रवास करायचा आहे ? प्रवासाची तारीख, वैयक्तिक माहिती आणि इतर माहिती द्यावी लागते. अर्ज भरताना काही वेळेस प्रवासाची चुकीची तारीख टाकली जाते. चुकीची तारीख प्रवासाच्या तारखेच्या १ दिवसआधीची असेल, तर काही जण त्याच दिवशी प्रवास करतात. मात्र जर प्रवासाच्या तारखेत महिना टाकताना चूक झाली, तर त्याला दुरुस्ती करण्याशिवाय पर्याय नसतो.

भारतीय रेल्वे प्रवाशांना अनेक सुविधा देते. त्यानुसार रेल्वे प्रवाशांना आरक्षित तिकीटावरील प्रवासाची तारीख दुरुस्त करण्याची सुविधा आहे. मात्र ही तारीख बदलण्याची सुविधा फक्त ऑफलाईन काढलेल्या तिकीटांसाठीच असते. सोप्या भाषेत सांगायचं झाल्यास तुम्ही जर तिकीट खिडकीवरुन तिकीट मिळवलं असेल, तरच तुम्हाला तारीख बदलून मिळेल.

तारीख बदलण्यासाठी काय करावं ?

तुम्हाला तिकीटावरील प्रवासाची तारीख किंवा नाव बदलायचं असेल, तर त्यासाठी असलेल्या वेळेच्या मर्यादेबाबत माहिती असणं गरजेचं आहे.

तिकीटावरील तारीख आणि नावात बदल करायचा असेल, तर तुम्हाला जवळच्या रेल्वे स्टेशनवर जावं लागेल. तिकीटावरील नाव बदलायचं असेल तर प्रवासाच्या २४ तासांआधी जावं लागेल. तसेच तारखेत बदल करायचा असेल तर ४८ तासांआधी स्टेशन गाठावं लागेल.

तिकीट खिडकीवर तुम्ही काढलेलं ओरिजनल तिकीट आणि तारीख/नाव बदलण्यासाठीचा अर्ज द्यावा लागेल.

नाव आणि तारीख बदलण्यासाठी नियमांनुसार असलेलं शुल्क द्याव लागू शकतं.

पान १/४ वरून पुढे.....

## डॉ. ज्योतीताई मेटे...

परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी यावेळी अभिजीत पवार यांनी केलेली आहे. ज्योतीताई मेटे यांना विधान परिषदेवर संधी दिल्यावर बीडचा कायापलट होईल. ज्योतीताई मेटे एक हुशार व्यक्तिमत्व आहेत. मेटे साहेबांनी १०% राजकारण आणि ९०% समाजकारण केलेले आहे डॉक्टर ज्योती मेटे सुद्धा साहेबांसारखेच १०% राजकारण आणि ९० टक्के सम ाजकारण करतील. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक परंपरेनुसार एखाद्या लोकनेत्याच्या निधनानंतर त्यांच्या कुटूंबीयांच्या सोबत खंबीरपणे उभे राहण्याची आपली परंपरा आहे. यामुळे ज्योतीताई यांना विधान परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनातून होताना पाहायला मिळत आहे. मेटे साहेबांनंतर त्यांच्या कुटुंबाच्या पाठीमागे संपूर्ण जनता आहे. परंतु विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव झाला. लोकनेतेच्या पाठीमागे सर्व समाज बांधव ज्योतीताई यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा आहे. बीडचा विकास फक्त ज्योतीताई मेटेच करू शकतात. विधान परिषदेवर घेतल्यावर ज्योतीताई नक्कीच बीडचा विकास करतील. त्यासाठी ज्योतीताई यांना विधान परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी अभिजीत पवार यांनी केलेली आहे.

## आमदारांच्या वरदहस्तामुळे...

शेतकऱ्यांची फसवणूक आहे. अशी अनेक प्रकरणे असताना कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांना अरेरावीची भाषा करतात आणि आमदार बघ्याची भूमिका घेतात. यावरून कंपन्यांचे आमदारांशी आर्थिक हितसंबंध आहेत, हे स्पष्ट होते. असे असले तरी कोणत्याही शेतकऱ्याची पिळवणूक होत असल्यास माझ्याशी संपर्क करून तक्रारी द्याव्यात. आपण पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा करू, असेही पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## मतदान यंत्रांच्या....

भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. माजी आमदार मोहन जोशी, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे आणि पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. चव्हाण म्हणाले, 'कोणत्याही निवडणुकीत जनतेचा विश्वास असणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र, मतदान यंत्राबाबत जनतेचा विश्वास राहिलेला नाही. पुन्हा मतपत्रिकेवर (बॅलेट पेपर) निवडणुकांकडे जाण्याची मानसिकता निर्माण झाली आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने महाविकास आघाडीला ६५ टक्के मतदान केले. ४३ पैकी ३१ जागा (दोन तृतीयांश) देऊन केंद्रातील भाजप सरकारबद्दल तीव्र नाराजी दाखवून दिली. मात्र, पुढील चार महिन्यांच्या कालावधीत अचानक मतदारांच्या मनात एवढा बदल होऊन भाजप महायुती सरकारबद्दल इतका विश्वास संपादन करणे, अशक्य आणि अविश्वसनीय आहे. पक्ष फोडाफोडी, पेट्या घेऊन आमदार पळवापळवी आणि केंद्राकडून स्वायत्त यंत्रणांचा वापर करून विरोधकांना नामोहरम करण्यासाठी केलेले प्रयत्न याबाबत प्रचंड चीड असताना अचानक असा कोणता बदल झाला ?'

'निवडणूक आयोग ही घटनात्मक स्वायत्त संस्था असताना राज्यातील निवडणुकीत आयोग अत्यंत संथपणे काम करत होता. आत्तापर्यंत एकदाही विरोधी पक्षांना मतदान यंत्र तपासणीसाठी दिलेले नाही. केवळ मतदान यंत्र तपासणीसाठी देऊन उपयोग नाही. मतदान यंत्रासोबत त्यातील संगणकीय 'चिप' आणि त्यामध्ये तयार केलेला 'सोर्स कोड' आणि इलेक्ट्रॉनिक सर्किट तपासण्यासाठी द्यावे,' अशी मागणी चव्हाण यांनी केली.

'भारतातील लोकशाहीबद्दल जगात कुतूहल' 'जगाच्या पाठीवरील सर्वांत मोठी लोकशाही असलेला देश म्हणून भारताची ओळख आहे. त्यामुळे भारताबाबत बाहेरच्या देशांतही कुतूहल आहे. त्यामुळे या देशातील निवडणुका पारदर्शक होतात, हे दाखविण्यासाठी आयोगाने म तदान यंत्राबाबत उपस्थित केलेले प्रश्न दूर करावेत. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील इलेक्ट्रॉनिक तज्ज्ञांची समिती स्थापन करून मतदान यंत्र निर्दोष आहे, हे सिद्ध करावे,' अशी मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली.

## दीड कोटी बालकांना...

आरोग्य विभागाने 'राष्ट्रीय जंतनाशक दिना'ची तयारी केली असून, वैद्यकीय अधिकारी, शिक्षक व इतर संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील ५६,००७ अंगणवाडी केंद्रे, ५५,१०२ शाळा व महाविद्यालयांमध्ये सुमारे १ कोटी ४८ लाख मुला-मुलींना जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. काही कारणास्तव ४ डिसेंबरला ज्या बालकांना जंतनाशक गोळी दिली गेली नसेल अशा वंचित सर्व बालकांना १० डिसेंबरला मॉप-अप दिनी ही गोळी देण्यात येणार आहे.

जंतामुळे मुलांमध्ये निमिया , पोटदुखी, उलट्या, अतिसार, मळमळ, भूक मंदावणे यासह कुपोषण, वाढ खुंटणे आदी आजारांचा मुलांना धोका असतो. त्यामुळे १ ते १९ वयोगटातील मुलांना वर्षातून दोन वेळा जंतनाशक गोळी देणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाकडून सप्टेंबर आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांत जंतनाशक मोहीम राबविली जाते. या मोहिमेदरम्यान १ ते १९ वयोगटातील मुलांना अर्धी ते एक गोळी खायला किंवा पाण्यात विरघळून दिली जाते.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जंतनाशक दिनी १ ते २ वर्षे वयोगटातील बालकांना २०० मिलीग्रॅमची अल्बेंडाझोलची गोळी पावडर करून पाण्यात विरघळून देण्यात येते. २ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना ४०० मिलीग्रॅमची गोळी पावडर करून व पाण्यात विरघळून देण्यात येते. ६ ते १९ वर्षे वयोगटाच्या बालकांना ४०० मिलीग्रॅमची गोळी चावून खाण्यास किंवा पावडर करून पाण्यात विरघळून देण्यात येते.

बालकांच्या आरोग्याविषयी काही शंका असल्यास आरोग्य सल्ला व मार्गदर्शन केंद्राच्या टोल फ्री क्रमांक १०४ वर नागरिक संपर्क करू शकतात किंवा गरज भासल्यास तातडीच्या वैद्यकीय सेवेअंतर्गत कार्यरत रुग्णवाहिका सेवेच्या टोल फ्री क्रमांक १०८ वर संपर्क करुन रुग्णवाहिका मागवू शकतात.

अल्बेंडाझोल ही गोळी शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये मोफत दिली जाते. आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय यासोबतच अंगणवाडी, शाळा, महाविद्यालयांतही या गोळ्या मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. जंतसंसर्गाच्या प्रतिबंधासाठी दिली जाणारी ही जंतनाशक गोळी पूर्णपणे सुरक्षित आहे आणि मोठ्या प्रमाणावर जंतनाशक कार्यक्रमांसाठी वापरण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेद्वारे प्रमाणित करण्यात आलेली आहे.

## आ.संदीप क्षीरसागरांचा...

त्यामुळे आता विकास कामे आणि निधी यांची चिंता करण्याची कसलीही गरज नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले. यासोबतच मी अगोदरच सांगुन टाकले आहे की, 'जरांगे पाटील म्हणतील तसं...' असे सांगत मराठा आरक्षणाबाबत आपली स्पष्ट आणि उघड भूमिका असल्याचेही आ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. त्याबरोबरच पत्नी नेहाताई क्षीरसागर आणि बंधू अर्जून क्षीरसागर यांनीही निवडणूक काळात साथ दिल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास प्रामुख्याने खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे, माजी आ.उषाताई दराडे, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते रविंद्र दळवी, राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, उदयसिंह जी देशमुख, जेष्ठ विधीज्ञ ड.बाळासाहेब कोल्हे, जेष्ठ नेते डी.बी.बागल, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद खमरूल, अखिल मौलाना साहेब, इक्बाल मौलाना साहेब, ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर महेबुब यांच्यासह त्यांच्या संघटनेचे पदाधिकारी, जेष्ठ विधीज्ञ ड.विवेकानंद सानप, वैजनाथ नाना तांदळे, खुर्शीद आलम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बीड शहर, ग्रामीण एकूण म तदारसंघातील सर्व भागातून बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जास्तीत जास्त युवांनी...

प्रा. केशव भागवत, प्रा.एस.एस.राऊत , प्रा .डॉ. रवींद्र काळे , श्री .व्ही. बी ठोंबरे श्री. आर. एस .इंगळे आदींची उपस्थिती होती. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे यशस्वीतेसाठी क्रीडा अधिकारी अनिकेत काळे , कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गर्शक सतीश राठोड, रेवननाथ शेलार, अविनाश पाटील, धनेश करांडे, जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, राजेश बागलाने, मंगेश वडमारे आदी पुढाकार घेत आहेत.

## ई-पीक पाहणी...

एसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी DCS मोबाईल ॲपमध्ये पिकांची नोंद असणे आवश्यक आहे.

नवीन मोबाईल ॲपमधील आवश्यकता- पीक पाहणीसाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आत फोटो घेणे अनिवार्य आहे., पिकांचे दोन फोटो घेणे बंधनकारक., सुधारित पमधील नवीन सुविधा, शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी संबंधित समस्या सोडविण्यासाठी सहायक उपलब्ध असेल, असेही प्रशासनाने कळवले आहे.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण...

स्पर्श करत सखोल मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेचे शिक्षक अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बदल लवकर समजून घेतात व त्याप्रमाणे लगेच अंमलबजावणी करतात.परिवर्तनाशी सुसंगत बदल या शिक्षकांतील गुणांचे कौतुक करत कचरू चांभारे अनेक चिंतनीय मुद्दे मांडले.शासन राबवित असलेल्या उदंड उपक्रमाबाबत चिंता न करता ,आपण सर्व उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करावा .कारण उपक्रम हे विद्यार्थी हित लक्षात घेऊन तयार केलेले असतात. विद्यार्थी सुरक्षा,मुख्यमंत्री स्वच्छ सुंदर शाळा,म हावाचन स्पर्धा इत्यादी उपक्रमांची माहिती देत सर्व शाळांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

लांडे वस्ती शाळा निसर्गरम्य वातावरणात आहे.समाधानकारक पाऊस झालेला असल्यामुळे भोवतालची बहरलेली शेती व शाळेचा हिरवागार परिसर सान्निध्यात प्राचीन गुरूकुल वातावरणात झाडाखाली शिक्षण परिषद उत्साहात पार पडली.

घाटसावळी केंद्रातील घटक शाळांचे मुख्याध्यापक व सहशिक्षक उपस्थित होते. शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सतिश लांडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली रवि भंगावाड,रवि फड,मंगल सपकाळ ,सिंधु गोल्हार,भगिरथी मोराळे यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगल सपकाळ यांनी केले.लांडे वस्ती शाळेतील लहान बालकांनी सुंदर परिपाठ सादर करून उपस्थितांची मने जिंकली. पसायदानाने शिक्षण परिषदेची सांगता झाली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विजयसिंहजी पंडित आमदार झाल्याबद्दल गरजवंत कुटुंबाला किराणा किटचे वाटप

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये गेवराई तालुक्यातील सर्वसामान्य मतदारांनी आदरणीय विजयसिंह पंडित यांना प्रचंड मतांनी विजय करून आमदार केल्याबद्दल गेवराई तालुक्यातील शिवछत्र परिवाराशी सामाजिक बांधिलकी असणारे मावळे वेगवेगळ्या उपक्रमाने हा आनंदोत्सव साजरा करत आहेत.

यातीलच एक अग्रगण्य नाव म्हणजे दत्ताभाऊ पिसाळ होय.

गेवराई तालुक्यामध्ये धान्य बँकेच्या वतीने एक घास गरजवंताच्या मुखामध्ये जाण्यासाठी समाजातील अंध ,अपंग अनाथ निराधार ,वृद्ध बेघर, विधवा भगिनी यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे म्हणून सुरू असलेल्या या उपक्रमाला गेवराई शहरातील युवा नेतृत्व सातत्याने शिवछत्र परिवाराशी सामाजिक बांधिलकी निभावणारे खऱ्या अर्थाने राजांचा एक सच्चा मावळा म्हणून आदरनिय , नवनिर्वाचित



विजयराजे पंडित आमदार झाल्याबद्दल दत्ताभाऊ पिसाळ यांनी उमापूर पंचक्रोशीतील गरजवंत कुटुंबाला दहा हजार रुपयांचा किराणा वाटप करून खऱ्या अर्थाने एक आगळावेगळा विजयोत्सव साजरा केला.

गेवराई तालुक्यामध्ये धान्य बँकेच्या वतीने एक घास गरजवंतांना देण्यासाठी आदरणीय अमरसिंहजी पंडित साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त सातत्याने गरजवंतांना किराणा देण्याची पवित्र कार्य ही सातत्याने ते करत असतात. शिवछत्र परिवाराशी सामाजिक बांधिलकी निभावणार एक सच्चा मावळा म्हणजे दत्ताभाऊ पिसाळ. शिवछत्र परिवाराचं कुटुंब म्हणजे संपूर्ण गेवराई तालुका होय. गेवराई तालुक्याच्या कानाकोपऱ्यामध्ये कोणावरही सुखदुःखाचा प्रसंग असो त्या ठिकाणी शिवछत्र परिवार हा अर्ध्या रात्री धावून जातो.

आजपर्यंत शेकडो उपक्रम या परिवाराने या तालुक्यातील गोरगरीब जनतेसाठी राबवलेले आहेत. सामूहिक विवाह सोहळा असो, शेतकऱ्यांना मार्गदर्शन असो, अपंग बांधवांना कृत्रिम अवयवाचे वाटप करणे असो, विधवा भगिनींना मदत असो, कोविडमध्ये रुग्णांना आधार सेंटर उभारण्याचे काम असो

असे विविध उपक्रम शिवछत्र परिवाराने या तालुक्यातील गोरगरीब जनतेसाठी राबवलेले आहेत. या परिवाराचा एक छोटासा मावळा म्हणून आपणही खारीचा वाटा उचलावा याच दृष्टिकोनातून गेल्या काही वर्षापासून ३१ मे या दिवशी एक अभ्यासू नेतृत्व आदरणीय अमरसिंह जी पंडित साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरामध्ये ज्या मुली जन्माला येतील त्या मुलींच्या नावे प्रत्येकी पाच हजार रुपये टाकण्याचे पवित्र कार्य दत्ताभाऊ पिसाळ गेल्या काही वर्षांपासून सातत्याने करतात, दत्ताभाऊंनी माझ्या फोन पे वरती दहा हजार रुपये पाठवले असता आज दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी दहा हजार रुपयांचा किराणा घेऊन उमापूर गावातील विधवा भगिनी, गरजवंत, निराधार, अनाथ, काही निराधार वृद्धांना या किराणाचे वाटप करण्यात आले.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक माजी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब दादा देशमुख, सामाजिक कार्यकर्ते मधु भाऊ आहेर ,सलीम भाई, मा.पं. समिती सदस्य अजय औटी, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल भाई तालेफ, जुबेर भाई कुरेशी ,माऊली पिंगळे, सतीश पांगरे, संतोष दिलवाले ,अक्षय भैय्या काशीद ,जावेद भाई, जळगाव येथील ह .भ. प. वैद्य महाराज, पत्रकार आमीन भाई ,नाटकर साहेब उपस्थित होते.

या विजयोत्सवच्या माध्यमातून दहा कुटुंबाच्या चेहऱ्यावर हास्य फुलत असेल तर खऱ्या अर्थाने हा विजयोत्सव साजरा झाला असे म्हणता येईल.

दत्ता भाऊंनी राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व उमापूर ग्रामस्थांकडून व संघर्ष धान्य बँकेचे संस्थापक अध्यक्ष झेंडेकर सर आदर्श शिक्षक मा श्री सुभाष काळे सर लेखक धर्मराज करपे सर व संघर्ष धान्य बँकेच्या सदस्यांनी कौतुक केले आहे..

## खरिप पीककर्ज प्रकरणे अद्याप प्रलंबित; एसबीआय आरएसीसीकडील पेंडींग फाईल निकाली काढाव्यात

### अग्रणी बँक मॅनेजर यांच्याकडे संचालक धनंजय गुंदेकर यांची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना खरिपाच्या बी बियाणे खरेदी व इतर अत्यावश्यक कामांसाठी लागणारी रक्कम मिळावी अन् खाजगी सावकारकीचा फास शेतकऱ्यांच्या भोवती आवळला जाऊ नये म्हणून पीककर्ज योजना सुरू करण्यात आली मात्र पीककर्ज बँकांकडून वेळेवर मिळत नसेल तर शेतकऱ्यांनी जायचं कुणीकडे? असाच प्रकार एसबीआय बँकेच्या शाखांबाबत झाला असून घाटसावळी येथील एसबीआय शाखा मधील पीककर्ज फाईल मंजूरीसाठी जेव्हापासून अंबाजोगाई येथील आरएसीसी कडे जायला लागल्या आहेत तेव्हापासून शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्यास दिरंगाई होत आहे.

खरीप हंगाम संपुष्टात आला तरी पीककर्ज पासून अलिप्त राहत असलेल्या शेतकऱ्यांची तक्रार कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक धनंजय गुंदेकर यांच्याकडे आली असता अग्रणी बँक मॅनेजर यांच्याकडे रीतसर लेखी तक्रार करत तत्काळ शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करावे अशी मागणी धनंजय गुंदेकर यांनी केली आहे. बीड तालुक्यातील विविध ठिकाणच्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखांमधील फाईल यापूर्वी बीड येथूनच मंजूर होत होत्या, मात्र जेव्हापासून या फाईल अंबाजोगाई येथे जाऊ लागल्या आहेत तेव्हापासून शेतकऱ्यांना वेळेत मंजुरी मिळत नाही. ह्या बाबीची तत्काळ दखल घेऊन विनाविलंब शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध व्हावे यासाठी पावले उचलण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे. येत्या गुरुवार पर्यंत वाटप करावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असाही इशारा गुंदेकर यांनी दिला आहे.

# सीसीआयकडून बीड तालुक्यात १० हजार ६११ क्विंटल कापूस खरेदी

### परवानाधारक खाजगी व्यापाऱ्यांनाच कापूस विक्री करून शेतकऱ्यांनी फसवणूक टाळावी : संचालक धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

येथील कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत 'सीसीआय'मार्फत होणाऱ्या २ जिनिंग वरील खरेदीतून कापसाला किमान ७ हजार ३०० रुपये तर कमाल ७ हजार ४९० रुपये व खासगी कापूस खरेदीदारांमार्फत किमान ७ हजार व कमाल ७ हजार १३५ रुपये असा भाव मिळत आहे. २९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सीसीआय अंतर्गत १० हजार ६११.६० क्विंटल कापसाची खरेदी झालेली असून शेतकऱ्यांना त्याचे पेमेंट देखील विक्रीच्या ४ ते ७ दिवसांत खात्यावर पाठविण्यात येते असल्याची माहिती संचालक



धनंजय गुंदेकर यांनी दिली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत बीड तालुक्यात २ ठिकाणी सीसीआय अंतर्गत कापूस खरेदी करण्यात येत असून यामध्ये सिद्धी जिनिंग, हनुमान नगर, बीड व श्री नगद नारायण कॉटन, साक्षाळ पिंप्री समावेश आहे. शेतकऱ्यांनी सीसीआय कडे कापूस विक्रीस घेऊन येण्यापूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच शेतकरी बांधवांनी अनधिकृतपणे शेतीमाल खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या आमिषांना बळी न पडता अधिकृत परवानाधारकांनाच आपला माल विक्री करावा, हिशोबपट्टी हस्तगत करावी, अनधिकृतपणे शेतीमाल खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा संचालक धनंजय गुंदेकर यांनी दिला असून फसवणुकीचा प्रकार घडल्यास शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती बीड यांच्याकडे तक्रार करावी असेही आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

# बीड मध्ये मोफत कृत्रिम हात, पाय वाटप होणार

**बीड । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यसैनिक, सहकारी चळवळीतील अग्रणी नेते देशभक्त पद्मश्री डॉ. रत्नाप्पा कुंभार यांच्या पुण्यस्मृती निमित्त कुभार समजा विकास संस्था, बीड व साधु वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबर पासून निर्मित अत्यंत हलके व मजबूत कृत्रिम हात व पाय पूर्णपणे मोफत बसवले जाणार आहेत. यासाठी गरजूंच्या हात व पायाचे माप घेण्यासाठी रविवार २२ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा, राष्ट्रवादी भवन समोर बार्शी रोड बीड येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व समाजातील गरजवंतांनी नोंदणी करून आपल्या हात व पायाचे माप द्यावे असे आवाहन रामदास कुंभार, चनबस वायकर यांनी केले आहे. देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांच्या पुण्यस्मृती दिन २३ डिसेंबर रोजी विविध उपक्रमाने साजरा केला जातो.



या निमित्त कुभार समाज विकास संस्था बीड च्या वतीने गोर-गरिबांसाठी बीड मध्ये मोफत कृत्रिम हात, पाय वाटप करणार आहे. २२ डिसेंबर रोजी हात व पायाची मापे घेतली जाणार असून मापे घेतल्यानंतर ३० ते ३५ दिवसांनी मोफत अवयव वितरण केले जाणार आहे. गरजवंतांना एकही रूपया लागणार नाही. कृत्रिम हात व पाय लावल्यानंतर मनुष्य चालु शकतो, सर्व दैनंदिन कामे करू शकतो. जिना सुध्दा चढू शकतो, सायकल चालवू शकतो. त्यामुळे गरजवंतांनी लाभ घ्यावा असे आवाहन रामदास कुंभार मो. ९८६०५७२३८३, चनबस वायकर ९८२२४८१३८२ यांनी केले आहे.


**टी.सी. हरवला आहे.**

सुप्रिया सुनिल महाकुंडे या नावाचा इयत्ता बारावीचा टीसी व सनद इतर कादगपत्र बस प्रवासात वांगी ते बीड या दरम्यान हरवले आहेत. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क मो.न. ९८२३२ ८६४६४

पत्ता: राहणार बार्शी नाका बार्शी रोड, बीड



Regd.No. BHR/AJI/RSR/O/525/89

राजस्थानी नागरी सह पतसंस्था मर्या परळी वै.
लक्ष्मी मार्केट पहिला मजला परळी वै.
४३१५१५ जि२२४८३३ ०२४४६ फोन महाराष्ट्र बीड .
ई-मेल -:rajasthani.patsanstha@gmail.com

ISO 9001:2008 मानांकन प्राप्त संस्था

**प्रशासकीय समिती सदस्य :- श्री.एस के चव्हाण**

जा.क्र.RNSP/2024 दिनांक. 02/12/2024

**वाचा** :- 1.मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.परळी वै, जि.बीड यांचे कार्यालयी आदेश जा.क्र.सनिप/ प्रशासन/ रानाप/कलम 77/ बदल/229/2024 दि.29/05/2024.

**-: जाहीर प्रगटन :-**

या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, वाचा क्र.01 आदेशान्वये **राजस्थानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड** या संस्थेवर माझी प्रशासकीय समिती सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**राजस्थानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड** या संस्थेचे खालील तक्त्यामध्ये समाविष्ट असलेल्या थकबाकीदार सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या नावासमोर असलेली संस्थेची थकबाकी रक्कम व्याजासह आपल्या कर्ज खात्यामध्ये सात दिवसाच्या आत जमा करुन रितसर पावती घेऊन कर्ज खाते निल करुन घ्यावे. **अन्यथा संस्थेमार्फत आपल्या विरुध्द रक्कम वसूली करण्यासाठी योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद कृपया घ्यावी.**

| अ.क्र. | थकबाकीदार | व्याजासह थकबाकी रक्कम दि.31/03/2024 अखेर | अ.क्र. | थकबाकीदार | व्याजासह थकबाकी रक्कम दि.31/03/2024 अखेर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | बियानी कल्पना चंदुलालजी | 5805279 /- | 26 | मुंडे आत्माराम सोपान | 524102 /- |
| 02 | मुंदडा ओमप्रकाश बद्रीनारायण | 5084760 /- | 27 | शंकुरवार अनिल पंढरीनाथ | 520000 /- |
| 03 | पटेल मोबीन सिराजोद्दीन | 4202767 /- | 28 | गायकवाड श्रीरंग माहादु | 507010 /- |
| 04 | मुंदडा ओमप्रकाश बद्रीनारायण | 3008228 /- | 29 | मुंडे राजाराम लक्ष्मण | 502778 /- |
| 05 | अग्रवाल प्रल्हादकुमार दुर्गाप्रसाद | 2784716 /- | 30 | देशमुख साई राजेश | 500253 /- |
| 06 | कागले दिगाबंर रावसाहेब | 1924846 /- | 31 | देशमुख शिवाजी बालासाहेब | 494274 /- |
| 07 | बने बालाजी व्यंकटराव | 1498543 /- | 32 | गायकवाड मोहन यामाजी | 480530 /- |
| 08 | नागनाथ दुध संकलन नागापुर | 1423821 /- | 33 | फड रायचंद हरीश्चंद्र | 460118 /- |
| 09 | मुंडे हारीभाऊ काशीनाथ | 1373353 /- | 34 | खर्डे ज्ञानेश्वर दत्ताराव | 452502 /- |
| 10 | भुईटे रणजित निवृत्तीराव | 1302978 /- | 35 | जाधव बाबु परसराम | 435603 /- |
| 11 | भुईटे माया रणजित | 1302978 /- | 36 | अंबुरे वैजनाथ बाबुराव | 434922 /- |
| 12 | सोनी सुर्यकांत रामकिसन | 1215840 /- | 37 | देशमुख शिवाजी बालासाहेब | 432237 /- |
| 13 | भुईटे आकाश अतुल | 1166377 /- | 38 | आंबेकर भाग्येश भस्करराव | 412798 /- |
| 14 | हांडे ओमप्रकाश तुळशीदास | 1023047 /- | 39 | सोनी सुशांत सुर्यकांत | 403219 /- |
| 15 | आगरकर हनुमान किसन | 1009565 /- | 40 | मुळे दत्तात्रय मारोतीराव | 400000 /- |
| 16 | भुतडा शंकरलाल रामनाथ | 980646 /- | 41 | गिरी ज्ञानोबा विठ्ठल | 392672 /- |
| 17 | कागले शिवकन्या दिगाबंर | 851228 /- | 42 | आंधळे लक्ष्मी शिवाजी | 390019 /- |
| 18 | रिकिबे शिवानंद बाबुआप्पा | 805376 /- | 43 | पांचाळ राम हानवंता | 389532 /- |
| 19 | मुथा आदेश कांतीलाल | 763400 /- | 44 | मुंडे लक्ष्मण निवृत्ती | 385905 /- |
| 20 | होलनी नितीन नंदकिशोर | 669055 /- | 45 | गर्जे विजया प्रभाकर | 373484 /- |
| 21 | मुथा किशोर कांतीलाल | 630239 /- | 46 | शेप आत्माराम मारुती | 370017 /- |
| 22 | मुंडे वैजनाथ भगवान | 625305 /- | 47 | लोखंडे गोपीनाथ मुकुंदराव | 355314 /- |
| 23 | सारडा हेमलता रामेश्वर | 616821 /- | 48 | लोखंडे हनुमान वैजनाथ | 341723 /- |
| 24 | बोरा हिरालाल लालचंद | 566826 /- | 49 | शेख सिकंदर शेख लाल | 330025 /- |
| 25 | कुलकर्णी निशीकांत माणीकराव | 531847 /- | | | |

(एस के चव्हाण)
प्रशासकीय समिती सदस्य
राजस्थानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.परळी वै, ता.परळी वै, जि.बीड. तथा
मु.लि. संलग्न सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.परळी वै, जि.बीड
मो.नं.9404903634 / 9975703634


# महाराणी ताराबाई विद्यालयाचे क्रीडाशिक्षक उत्तरेश्वररावजी धस सर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडाशिक्षक उत्तरेश्वररावजी धस सर यांनी ३२ वर्ष ०४ महिने २८ दिवस प्रदीर्घकाळ विद्यालयांमध्ये ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून वयोमानानुसार शनिवार दि.३०नोव्हेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळ्याचा कार्यक्रम विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच सौ.सुलोचनाताई आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,उपसभापती अनिलदादा चोले,संचालक पांडुरंग अंडील,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकररावजी धस,कोषाध्यक्षा सौ.जिजाबाई धस,सेवानिवृत्त मुख्याध्यापक डोईफोडे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक उद्धवरावजी सांगळे,नगरसेवक सतीष बप्पा बडे,युवा नेते अमोलराजे आंधळे,संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे, विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर अदिजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात



आली. चंदना कापले,वैष्णवी यादव, आकांक्षा गावडे या विद्यार्थिनींनी स्वागतगीत गाऊन सर्व मान्यवर व उपस्थितांचे स्वागत केले. विद्यालयातील विद्यार्थिनी कु.राधिका निरडे,कु.शिंदे अंकिता,कु.झाडे निकिता यांनी धस सर यांच्या बद्दल आपल्या शाळेतील आठवणी सांगितल्या तसेच श्रीमती संजिवनीताई आंधळे व ठोंबरे सर,माजी नगरसेवक सतीषबप्पा बडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून धस सरांना सेवापूर्ती निमित्त शुभेच्छा दिल्या.

क्रीडा शिक्षक उत्तरेश्वर(अप्पा) महादेव धस सर यांना सेवापूर्ती निमित्त जोड आहेर व सन्मानपत्रक विद्यालयाच्या वतीने भेट देऊन सहपत्नीक सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष व मान्यवर,संस्थेचे पदाधिकारी,विद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य,पर्यवेक्षक यांच्या हस्ते करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती धस सर म्हणाले की, शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी त्यांच्या उज्वल भविष्यासाठी काम करत असताना अनेक अडचणी आल्या त्यावर मात करून आम्ही यशस्वी झालोत शाळेने मला खूप काही दिल आहे शाळेला आणि विद्यार्थ्यांना मी कधीही विसरू शकत नाही आज माझ्या एका डोळ्यात आनंद तर एका डोळ्यात अश्रू आहेत असे ते म्हणाले तसेच संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी शाळेच्या प्रगतीसाठी क्रीडा क्षेत्रामध्ये भरीव योगदान दिल्याबद्दल धस सरांन बद्दल कर्तज्ञता व्यक्त करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोपपर विचार व्यक्त करताना माजी आमदार केशवदादा आंधळे म्हणाले की,शाळेच्या प्रगतीसाठी धस सरांचे भरीव योगदान आहे ते कधीही आम्ही विसरू शकणार नाहीत शाळेचे नावलौकिक क्रीडा क्षेत्रामध्ये त्यांनी केलेल आहे असे गौरव उद्गार काढून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू आंधळे सर यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार प्रा.मुंडे सी.व्ही.यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

सोमवार, दि.०२ डिसेंबर २०२४ पान ४

# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955




*बीड शहरातील भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली मतदार नोंदणी अभियान भारतीय जनता पक्ष नोंदणी अभियान आमदार पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरात करण्यात येत आहे. या प्रसंगी भाजपाचे पदाधिकारी नवनाथ आण्णा शिराळे, अशोक लोढा, ॲड. धसे ताई, मुन्ना फड आदी छाया चित्रात दिसत आहेत.*

# जास्तीत जास्त युवांनी महोत्सवात सहभाग नोंदवावा: अरविंद विद्यागर

**▸जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजनासाठी बैठक**

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यम ाने ०४ ते ०५ डिसेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हास्तरीय म होत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ ते २९ वयोगटातील जास्तीत जास्त युवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन संदर्भात समिती सदस्य, तज्ज्ञ, परीक्षक यांची बैठक शुक्रवारी (ता.२९) पार पडली. बैठकीस माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी अरुणा कोचुरे, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, तुकाराम पवार, गटशिक्षणाधिकारी श्री . तुरुकमाने आदींची उपस्थिती होती. बैठकीत शिक्षणाधिकारी श्री. शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर यांनी जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजना बाबत उपस्थितांना माहिती दिली.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना यावर आधारित स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, यात समूह लोकनृत्य , लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम, या कथालेखन , चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता लेखन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम ७ हजार , द्वितीय ५ हजार, तर तृतीय ३ हजार रुपये देण्यात येणार आहेत. लोकगीत स्पर्धे साठी विजेत्यास प्रथम ५ हजार, द्वितीय ३ हजार, तर तृतीय २५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत.

बैठकीस जिल्ह्यातील युवा क्षेत्रात काम करणारे दिनकर थोरात, प्रा. दीपक जमदाडे, प्रा. राम गव्हाणे, प्रा. सोपान सुरवसे,

▶▶ उर्वरित पान २ वर

## ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपद्वारे होणार ई-पीक पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

रब्बी हंगाम एक डिसेंबर २०२४ पासून राज्यात सुरू होत आहे. शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्यासाठी आधी ई-पीक पाहणी मोबाईल ॲप उपलब्ध होते. परंतु आता केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे काही तांत्रिक दुरूस्ती करून नवीन रूपात ई-पीक पाहणी DCS मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या नंतर १०० टक्के पीक पाहणी सुधारित ई-पीक पाहणी DCS मोबाईल ॲपद्वारे संपूर्ण राज्यात होणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आपली पीक पाहणी ठराविक मुदतीत करून घ्यावी. जेणेकरून कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचण येणार नाही, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून केले आहे.

शेतकरी स्वत: पिकांची नोंद ई-पीक पाहणी मोबाईल पद्वारे नोंदवायचे व उर्वरीत पीक पाहणी जे शेतकऱ्यांनी नोंदवलेली नाही, ते तलाठी यांच्यामार्फत होत असत. त्यामध्ये दुरूस्ती करून शेतकऱ्यांना हंगामाच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी करण्यासाठी सहायक यांची नेम णूक करण्यात येत आहे. प्रत्येक गावासाठी सहायक उपलब्ध राहणार असून सहायकामार्फत पीक नोंदणी होणार आहे. पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एम

▶▶ उर्वरित पान २ वर

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करावी : कचरू चांभारे

**घाटसावळी । प्रतिनिधी**



घाटसावळी केंद्राची शिक्षण परिषद लांडे वस्ती क्रमांक १ शाळेत पार पडली. परिषदेच्या अध्यक्ष स्थानी प्रभारी केंद्रप्रमुख कचरू चांभारे होते. प्रमुख अतिथी म्हणून घाटसावळी केंद्र मुख्याध्यापिका माधुरी भणगे, बकरवाडी शाळेचे मुख्याध्यापक बंडू घोरड, मैंदा शाळेचे मुख्याध्यापक अभिमन्यू नाटकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अस्लम पठाण हे होते.

अशोक जोशी, रवि भंगावाड, माधुरी भणगे यांनी पायाभुत चाचणी विश्लेषण,परसबाग,आनंददायी शनिवार या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी केंद्रप्रमुख यांनी सर्व विषयांना ▶▶ उर्वरित पान २ वर

## शाळांच्या शैक्षणिक सहलींसाठी ५० टक्क्यांची सवलत सहलीसाठी शिक्षण विभागाचे निर्देश पाळणे बंधनकारक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिवाळीच्या सुट्या संपल्यानंतर आता शाळा सुरू झाल्या असून सहलीचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी निम्मे दर आकारले जाणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना कमी पैशात जास्त प्रवास करून अधिक शैक्षणिक प्रेक्षणीय स्थळांना भेटी देता येतील.

शैक्षणिक संस्थांकडून बस बुकिंग सुरू झाले आहे. परिवहन मंडळाने देखील खास विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के सवलत दिली आहे. शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेता यावा, त्यांना अभ्यास भेटीदरम्यान प्रेक्षणीय स्थळांची पाहणी करता यावी याकरिता विविध स्थळांना भेटी देण्याचे किंवा निसर्ग, शैक्षणिक, विज्ञान सहलीचे आयोजन केले जाते. दरम्यान, दिवाळीनंतर फेब्रुवारीपर्यंत शाळांकडून शैक्षणिक सहलीचे नियोजन केले जाते. विद्यार्थ्यांना कमी पैशात जास्त प्रेक्षणीय स्थळांना भेटी देता याव्यात याकरिता प्रवास तिकिटात ५० टक्के सूट देण्यात येत आहे. दरम्यान, ४५ व्यक्तींची आसन क्षमता असणाऱ्या एसटीसाठी शाळांकडून २७.५० रुपये प्रतिकिलोमीटर याप्रमाणे पैसे घेण्यात येणार आहे. तसेच आगारांतील बसेस मागणीनुसार उपलब्ध करून देणार असल्याचे राज्य परिवहन विभागीय महामंडळाच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या ऑनलाईन अर्जासाठी १६ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना घरभाडे व इतर खर्च भागविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षापासून ही योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १६ डिसेंबरपर्यंत वाढविली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन पद्धतीने विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे.

# आणखी एका पतसंस्थेत घोटाळा

## माजलगावच्या 'हिंदवी स्वराज्य'च्या अध्यक्षासह 20 जणांवर गुन्हा




**एकूण १ कोटी ८ लाखांचा अपहार**

**या पद्धतीने रोख शिल्लक १५ लाख रुपये, बोगस नोंदी ५० लाख रुपये, बोगस कर्ज १२ लाख ४४ हजार रुपये असे मिळून एकूण एक कोटी आठ लाख ३६ हजार ८१० रुपयांचा अपहार झाल्याचे लेखपरीक्षणात स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी पतसंस्थेचे अध्यक्ष रमेश वामन, सचिव महानंदा सखाराम मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश सखाराम मोरे यांच्यासह संस्थेतील कर्मचारी अजय नारायण नाईकनवरे, ताराचंद शाम बोले, भागवत अशोक गरड, गणेश माणिक वेळवे, अमर लहू देवकते, शुभम संजय गोपाळ, भागवत राजेभाऊ कुटे, नरेंद्र राजेंद्र माधवे, भाग्यश्री रमेश वामन, वैष्णवी सुरेश मोरे, कमलाकर बाबासाहेब उंबरे, तेजस प्रकाश महाजन, सत्यभामा पांडुरंग पाष्टे, सुरेश चंद्र सुधाकर निळगे, मंगल श्याम बोले, अमोल लहू देवकते, आनंद निवृत्ती सरवदे, पवन मुरलीधर पदमगीरवार, प्रदीप मारुती गांजकर, प्रसाद प्रभाकर वंजारे या सर्वांनी मिळून संगनमताने संस्थेच्या रकमेच्या अपहार करून फसवणूक केल्याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात लेखापरीक्षक शिंदे यांच्या तक्रारीवरून शुक्रवारी रात्री गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

**माजलगाव । प्रतिनिधी**

ठेवीदारांनी विश्वासाने ठेवलेल्या ठेवींच्या गैरवापर करून बनावट फाईल तयार करून बोगस कर्ज, बोगस सोनेतारण, बोगस नोंदी व हातावर रक्कम ठेवून १ कोटी ८ लाख ३६ हजार ८१० रुपयांच्या फसवणूक, अपहार केल्या प्रकरणी येथील हिंदवी स्वराज्य पतसंस्थेचा अध्यक्ष रमेश किसन वामन, सचिव महानंदा सखाराम मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश सखाराम मोरे यांच्यासह दहा संचालक, दहा कर्मचारी अशा २० जणांविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात शासनाचे सहकारी लेखापरीक्षक यशवंत बन्सीधर शिंदे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव शहरातील धारूर रोडवरील एलआयसी ऑफिसच्यावर मागील अनेक वर्षांपासून हिंदवी स्वराज्य पतसंस्था कार्यरत आहे. या ठिकाणी मागील एक वर्षभरात ठेवीदारांना आपल्या ठेवी परत न मिळाल्याने त्यांनी जिल्हा निबंधकांकडे या संस्थेविरुद्ध तक्रारी दाखल केल्या होत्या त्या अनुषंगाने शासनाचे लेखापरीक्षक यशवंत बन्सीधर शिंदे यांनी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २४ या कालावधीत या संस्थेचे लेखापरीक्षण केले. या लेखापरीक्षणात संस्थेने कमाल रोख मर्यादेचे उल्लंघन केल्याचे आढळून आले तसेच हातावर रक्कम ठेवून अपहार केला तसेच बनावट कर्ज प्रकरण, सोने तारण कर्जवाटप करून ते तिजोरीत न ठेवता सदरील रकमेचा अपहार केल्याचे उघडकीस आले.

# शनी अमावस्या निमित्त हजारो भाविकांनी घेतले शनि महाराजांचे दर्शन

## श्रीक्षेत्र राक्षसभुवन ; शनि महाराज कि जय ; घोषणांनी परिसर दणाणला

**गेवराई । प्रतिनिधी**



**भारतातील साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असलेल्या श्रीक्षेत्र राक्षसभूवन येथे शनि अमावस्या निमित्ताने यावर्षी भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले होते. यामध्ये भाविकांना शिस्तीत दर्शन घेता यावे यासाठी दर्शन रांगेचे नियोजन , महीलासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच वाहनांसाठी चार एक्कर मध्ये पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. तर भाविकांनी शनि महाराजांच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच गर्दी केली होती. तर जवळपास पन्नास हजारांपेक्षा जास्त भाविकांनी शनि महाराजांचे दर्शन घेतले आहे – संतोष विजयकुमार काठवटे, अध्यक्ष, श्रीक्षेत्र शनि महाराज, देवस्थान, राक्षसभुवन**

भारतातील साडे तिन पिठा पैकी एक मुख्य पिठ असलेल्या श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील शनि महाराज देवस्थानाचे विशेष महत्त्व असुन ते प्रसिध्द देवस्थान आहे. तर शानिवार दि.३० नोव्हेंबर रोजी शनी अमावास्या निमित्त याठिकाणी राज्यासह परराज्यातून भाविकांनी शुक्रवारी मध्यरात्री पासुनच श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथे शनी महाराजांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती.

यावेळी शनि महाराज कि जय अश्या जोरदार घोषणांनी परीसर दणाणून गेला होता. गेवराई तालुक्यातील श्री क्षेत्र राक्षसभुवन येथे शनीच्या साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असून शनिवारी शनि अमावास्या निमित्त शनी महाराजांच्या दर्शनासाठी हजारोच्या भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी शनीभक्तांनी शिस्तबद्ध पध्दतीने रांगेत उभा राहून दर्शन घेतले. तसेच या ठिकाणी पानफुल, नारळ, तेल , सुप्रसिद्ध पेढे व रेवडी सह खाऊवाल्यांचे दुकाने मोठ्या प्रमाणात थाटण्यात आले होते. तर शनी अमावस्या निमित रूद्र अभीषेक , शनि शांति ,शनिजप ,नवगृह जप तसेच अभिषेक करण्यासाठी भाविकांनी मंदीरात मोठी गर्दी होती. यावेळी बीड, गेवराई, चकलंबा, उमापुर सह तलवाडा येथील पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# लाडक्या बहिण(नीता अंधारे)यांनी बीड शहराची वाट लावली !

## नगरपालिकेतील सावळा गोंधळ थांबणार का?

**बीड । प्रतिनिधी**



बीड नगरपरिषद मुख्याधिकारी पदी नीता अंधारे यांची नियुक्ती झाल्यापासून शहराची अक्षरशः वाट लागली आहे. बीड शहरवासीयाना मूलभूत सुविधा मिळत नसून, ऐन पावसाळ्यात देखील पंधरा दिवसाला पिण्याचे पाणी,जागोजागी कचऱ्याचे साचलेले ढीग, मुख्यराचा तसेच गुल्लूगोलेतील विद्युत खांबावरील लाईट बंद, नालीसफाई झाली नसल्याने रस्त्यावर येणारे गटाराचे पाणी, कित्येक महिन्यापासून लिक्विडेटर,तसेच धूर फवारणी नसल्याने बीड शहरवासीयाचे आरोग्य धोक्यात घालण्याचे काम नीता अंधारे यांनी केले. एका रस्ते कामाचे दोन वेळ बिल देण्यात मुख्याधिकारी अंधारे यांचा सिंहाचा वाटा आहे.

बीड शहरातील कित्येक रस्त्याचे बोगस कामे झाले असून त्याची तक्रार काही सामाजिक कार्यकर्त्यांनी देऊन देखील त्या गुत्तेदाराची बिल टक्केवारी घेऊन दिल्या असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. परंतु काही ठराविक गुत्तेदाराना त्या हाताखाली धरून बोगस काम असल्याची माहिती असताना देखील फक्त टक्केवारीम ुळे त्यांची बिल दिले जातात. तेसेच नगरपालिकेतील फाईल रमाई घरकुल,पंतप्रधान घरकुल व रस्त्याचे काम झालेले बिलावर सह्या करण्यासाठी अंधारे मॅडम च्या घरी कर्मचारी फाईल घेऊन जातात.मूख्याधिकारी अंधारे यांना परळी व आष्टीतून आशीर्वाद असल्याने त्या कोणालाच जुमानत नाहीत. त्यामुळे बीड शहराची अक्षरशः वाट लागली आहे.यामुळे नगरपालिकेमध्ये सावळा गोंधळ सुरू असून, नगरपालिकेवर प्रशासक म्हणून असलेल्या कविता जाधव यांनी जाणीवपूर्वक नगरपालिका प्रशासनात लक्ष घालण्याची गरज आहे. नगरपालिके अंतर्गत बोगस बिलांचा अक्षरशः सुळसुळाट झाला असून, बाबर कोणाचे नियंत्रण आहे की नाही असा प्रश्न पडला आहे. मुख्याधिकारी असलेल्या नीता अंधारे आणि त्यांच्या सोबतच्या काही कथित लोकांनी नगरपालिकेत नंगानाच बालविला आहे. झालेल्या बोगस कामांची चौकशी करून कारवाई होण्याची गरज आहे.मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी पदभार हाती नगरपरिषदेत अजच कारभाराचा गजब पॅटर्न सुरू असून, याची शहरातच नव्हे तर जिल्ह्यात चर्चा आहे. त्यांच्या काळात शहरातील नागरी सुविधांचा बोजवारा उडाला आहे. त्यांच्या विरोधात अनेक आंदोलने झाली असून, नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे आंदोलन तर नेहम ीचेच झाले आहे. याची मोठी ओरड होत असल्याने अंधारे यांची बदलीची वेळोवेळी चर्चा झाली. पण त्यांना परळी आणि आष्टीचा आशीर्वाद असल्याने बदलीची चर्चा होते पण बदली काही होत नाही. अशी जोरदार चर्चा आहे. या आशीर्वादामुळे कोणालाही भीक घालत नसून आपल्या मर्जीने काम करतात. त्या येतात कधी जातात कधी वरच काही नेम नाही. यामुळे नागरिकांच्या कामांचा खेळ खंडोबा झाला आहे. बीड शहरवासीयाच्या मूलभूत प्रश्न कडे लक्ष देण्यापेक्षा त्यांच टक्केवारीवरच जास्त लक्ष असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लाडक्या बहिणीने बीड शहरवासीयांना मूलभूत सुविधा द्याव्यात अशी मागणी बीड शहरातील नागरिक करत आहेत.

CMYK